ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख ७ जानेवारी, १९५३ अंक १.

## विविध माहिती

**चीन–जपान व्यापार**—जपान आणि चीन ह्या देशांनीं एक व्यापारी सौदा करण्याचें ठरविलें आहे. चीनपासून ६,००० टन चीनमील घेऊन त्याचा बदला जपान ३,००० टन सामुद्रिक वनस्पति पुरविणार आहे. मालाची वहातूक जपानची बोट करणार आहे.

**चार्ली चॅपलीन भारताला येणार ?**—सुप्रसिद्ध विनोदी नट चार्ली चॅपलीन हे भारताला भेट देण्याच्या विचारांत आहेत असें समजतें. ते आपला पुढील बोलपट युरोपमध्यें पुरा करणार आहेत आणि नंतर पूर्वेकडील देशांच्या सफरीवर निघणार आहेत.

**डिझेलचीं रेल्वे–एंजिनें**—उतारूंची वहातूक करणाऱ्या रेल्वे गाड्यांसाठी डिझेल तेलावर चालणारीं हलक्या वजनाचीं एंजिनें वापरण्याचा बेत ब्रिटनमधील रेल्वेचे अधिकारी करीत आहेत. हीं एंजिनें दोन्ही बाजूंनीं चालवितां येतात, त्यांना गति लवकर येते आणि खर्च कमी येतो. ह्या एंजिनासाठी ५,००,००० पौंड खर्च करण्यांत येणार आहेत.

**कामगारांसाठी आरोग्य-मंदिर**—न्यूझीलंडमधील ऑकलंड शहराजवळ कामगारांसाठी एक आरोग्य–मंदिर बांधण्यांत येणार आहे. इमारतनिधिसाठी वर्कर्स कॉंपेन्सेशन बोर्डानें ५,००० पौंडांची देणगी दिली असून कारखानदारांकडूनहि मदत मागण्यांत येणार आहे. न्यूझीलंडमधील अशा प्रकारचें हें पहिलेंच मंदिर असून त्यांत २,००० कामगारांची सोय होईल.

**पं. नेहरूंच्या स्वाक्षरीची किंमत**—कलकत्ता येथील राजभवनांत पं. नेहरू ह्यांची स्वाक्षरी असलेली एक दहा रुपयांची नोट लिलांवात १,२०० रुपयांना विकण्यांत आली. दार्जिलिंग येथें देशबंधु चित्तरंजन दास ह्यांनीं आपले अखेरचे दिवस ज्या घरांत घालविले, तें घर विकत घेण्यासाठी वरील रकमेचा विनियोग करण्यांत येणार आहे.

**वाळवंटाची सुपीक जमीन**—कास्पिअन समुद्राच्या काठाशीं असलेल्या विस्तीर्ण वाळवंटाची प्रयत्नानें सुपीक जमीन करण्याची एक योजना रशिअन शास्त्रज्ञांनीं आंखली आहे. वाळवंट आशिया आणि युरोप ह्यांच्या सरहद्दीवर असून त्यांत भटक्या टोळ्यांशिवाय कोणाचीहि वस्ती नाहीं.

**ओरिसामधील जमीनदारी**—ओरिसामधील जमीनदारी नाहींशी करण्याच्या धोरणाप्रमाणें जैपूर ह्या नांवाची सर्वांत मोठी जमीनदारी मिळकत सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली आहे. ह्या जमीनदारीचा विस्तार १२,००० चौरस मैल असून उत्पन्न २७ लाख रुपयांचें आहे. जैपूरच्या महाराजांनीं आपण होऊन हक्क सोडून वार्षिक तनखा घेण्याची तयारी दाखविली होती.

**चीनमधील पेनिसिलिनचा कारखाना**—शांघाय शहरांत चीनमधील पेनिसिलिनचा पहिला कारखाना लवकरच उभारण्यांत येणार आहे. हें औषध तयार करण्याची एक नवीनच पद्धत चिनी रसायन शास्त्रज्ञांनीं शोधून काढली असल्याचें समजतें. सरकीच्या पेंडीचा उपयोग करून पेनिसिलिन तयार करण्यांत येणार आहे. अमेरिका वापरीत असलेल्या कच्च्या मालापेक्षां हा माल स्वस्त आहे.

**ब्रिटनमध्यें पोपटांची आयात**—ब्रिटनमध्यें २० वर्षांपूर्वीं पोपटांच्या आयातीवर बंदी घालण्यांत आली होती. त्यानंतर ती उठविण्यांत आली. परंतु आतां ती पुन्हा घातली जाण्याचा संभव आहे. ऑस्ट्रेलियांतून आयात केलेल्या पोपटांची व्यवस्था लावतांना एका माणसाला पोपटापासून होणारा रोग होऊन तो मेला; त्यामुळें हा प्रश्न आरोग्य खात्याकडे विचारासाठी गेला आहे.

**यांत्रिकीकरण झालेलें मोठें शेत**—जम्मू पासून २० मैलांवर भारतामधील सर्वांत मोठें यांत्रिकीकरण झालेलें शेत आहे. हें शेत स्थापन करण्यासाठी काश्मीर सरकारनें १२,००० एकर जमीन भारत–सरकारला दिली. १० वर्षांनंतर तें परत काश्मीर सरकारला देण्यांत येईल. शेतावर १८ ट्रॅक्टर्स असून १,४०० एकर जमीन त्यांच्या साह्यानें नांगरण्यांत आली आहे. १९५४ अखेर १०,००० एकर जमीन लागवडीखालीं आणली जाईल. ह्या शेतामुळें जम्मू प्रांतांतील अन्नधान्याची तूट १२,००० टनानें कमी होईल.

**शहरांतील घरांची टंचाई**—भारतामधील सर्व प्रमुख शहरांत मिळून ४३ लक्ष घरांचा तुटवडा आहे. ह्या शहरांतून १७,१४,५६० लोक कारखान्यांतून कामें करतात. त्यांपैकी ४,५४,००० कामगारांना तावडतोब घरांची जरूरी आहे. आरोग्य–समितीच्या अंदाजाप्रमाणें शहरांत १०,८४,०४० घरांची गरज आहे.

**सोनें परदेशीं पाठविलें**—पॉंडेचरी येथील इंडोचायना बँकेनें ता. २५ डिसेंबर रोजीं २,५६,५१,१९२ रुपये किंमतीचें सोनें खास विमानानें फ्रेंच सोमाली–लँडकडे रवाना केलें. फ्रेंच–भारत सरकारनें सोन्याची निर्यात करण्यास बंदी केली होती. परंतु बँकेनें पॅरिसहून फ्रेंच सरकारचा परवाना काढून निर्यात केली.

**डहाणू बंदराची सुधारणा**—दुय्यम बंदरांच्या विकासाचा जो कार्यक्रम आंखण्यांत आला आहे त्यांत डहाणू बंदराच्या विकासयोजनेचा समावेश करण्यांत आला आहे. सध्यां बंदराची पहाणी करण्याचें कार्य सुरू आहे. बंदरानजीक बांधण्यांत आलेल्या दीपगृहावर विजेची सोय करण्यांत येणार आहे.

# “अर्था”स आलेले संदेश

[“अर्था” च्या १९ व्या वाढदिवसानिमित्त संपादकाकडे अनेक स्नेह्यांचे व हितचिंतकांचे संदेश आले आहेत, त्यांतील शुभेच्छांबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. [illegible] कांहीं संदेश येथें देत आहों.]

“अर्था”नें मराठी वाचकांची आज १८ वर्षें केलेली सेवा सर्वांस परिचित आहे. कै. श्री. वामनराव काळे यांनी हें साप्ताहिक काढलें तेव्हां अर्थशास्त्रासारख्या रुक्ष विषयास वाहिलेलें साप्ताहिक—विशेषत: मराठी भाषेंतील—कसें टिकेल याची अनेकांस शंका वाटत होती. सुरुवातीचा टप्पा वामनरावांच्या व्यक्तिमत्वामुळेंच पुरा झाला. परंतु त्यांच्या पश्चात त्यांच्या चिरंजीवांनींहि साप्ताहिकाचें प्रकाशन चालू ठेवलें, एवढेंच नाहीं तर तें दिवसेंदिवस अधिक माहितीपूर्ण व आकर्षक करून दाखविलें हें विशेष कौतुकास्पद आहे. “अर्थ” हें चिरस्थायी होऊन त्याची उत्तरोत्तर अधिक वाढ होवो असेंच कोणीही चिंतणार!”

गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स्<br>अँड एकॉनॉमिक्स, पुणें ५ } ध. रा. गाडगीळ

---

“सतत अठरा वर्षें आर्थिक व्यवसायास वाहिलेलें साप्ताहिक आपण नेटानें व एका उच्च ध्येयानें चालवीत आहांत याबद्दल आपलें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे.

“अर्थ व व्यापारविषयक रुक्ष वाटणाऱ्या विषयांतहि आपण सर्वसामान्य मराठी वाचकांमध्येंहि निश्चित जिज्ञासा उत्पन्न केली आहे. बँकिंग क्षेत्रांत तर ‘अर्थ’ची कामगिरी भरीव अशीच आहे. केवळ संचालक, व्यवस्थापक वर्गासच नव्हें तर बँकांच्या गिऱ्हाइकांसहि ‘अर्थ’नें मार्गदर्शन केलें आहे. वादग्रस्त प्रश्नांतहि कोणत्याहि एका विचाराचाच पुरस्कार न करतां सर्व मतांस आपल्या पत्रांत स्थान मिळूं शकतें ही गोष्ट सर्व मतांचा समन्वय साधण्याची आपली हातोटी सिद्ध करते. आपल्या वडिलांचेपासून आपणहि साउंड बँकिंगच्या प्रॅक्टिसचाच पुरस्कार करीत आलां आहांत. या बाबतींत कोणत्याहि व्यक्तींच्या अगर संस्थेच्या दडपणाचा आपणांवर परिणाम होत नाहीं ही विशेष समाधानाची गोष्ट आहे. ‘अर्थ’ची अशीच भरभराट होवो अशी शुभेच्छा प्रगट करून हें पत्र पुरें करतों.”

बँक ऑफ महाराष्ट्र लि.,<br>पुणें } चिं. वि. जोग

---

“आपल्या साप्ताहिकास १८ वर्षें पूर्ण होऊन आपण १९ वें वर्षांत पदार्पण करीत आहांत. या आपलें ‘दीड तपाचे’ अविरत सेवेबद्दल आम्हीं आपले मनःपूर्वक अभिनंदन करीत आहोंत.

“गेल्या १८ वर्षांतील आपली महाराष्ट्रांतील आर्थिक विषयाबाबतची कामगिरी विशेष उल्लेखनीय अशी असून या विषयांवरील आपले साप्ताहिकांतील लेखांचे दर्जामुळें मराठी साप्ताहिकांत आपलें स्थान अढळ झालें आहे. इंग्रजींतील ‘कॉमर्स’ व मराठींतील ‘अर्थ’ या वर्तमानपत्रांचीं मतें हीं निदान ‘बँकिंग’ क्षेत्रांत तरी “अधिकृत” अशीं मानण्यांत येतात, यावरूनच आपला अत्युच्च दर्जा सिद्ध झाला आहे.”

“कै. दादासाहेब काळे यांचें हें कार्य आपलेहि हातून अखंड व भरभराटीनें चालावें हीच सदिच्छा.”

भारत इं. बँक लि.<br>पुणें २ } नि. ना. क्षीरसागर

“I congratulate you on your completion of 18 years and starting the 19th. I wish increasing success to the ‘Artha’.”

University of Poona,<br>Poona. } M. R. Jaykar.

---

“आज “अर्था” ला १९ वें वर्ष सुरू होत आहे. या वाढदिवसानिमित्त मी आपलें अभिनंदन करतों व “अर्था” ला दीर्घायुष्य प्राप्त होऊन त्याच्या हातून अधिकाधिक महत्त्वाची समाजसेवा घडो असें मी इच्छितों.”

किर्लोस्कर बंधु लि.<br>किर्लोस्करवाडी } शं. वा. किर्लोस्कर

---

“देशाची सर्वांगीण प्रगति झाली पाहिजे. ही प्रगति साधण्याकरितां आर्थिक प्रश्नांची समस्या सोडविली गेली पाहिजे. आर्थिक प्रश्नांची समस्या सोडविण्याकरितां लागणाऱ्या ज्ञानाचा पुरवठा ज्या मार्गानें शक्य असेल त्या त्या मार्गानें तो झाला पाहिजे. तो पुरवठा करण्याचें कार्य एकट्या कुणालाच पुरें करतां येणार नाहीं. ज्याला जसें शक्य असेल त्यानें तसें हा ज्ञानाचा पुरवठा कोणाची वाट न पहातां करण्याची तयारी ठेविली पाहिजे. अशा तऱ्हेचा पुरवठा करण्याचें कार्य प्रो. वा. गो. काळे यांनीं सुमारें दीड तपापूर्वी सुरू केलें व हा पुरवठ्याचा ज्ञानदीप त्यांचे चिरंजीव श्रीयुत श्रीपादराव काळे यांनीं पूर्वीपेक्षांहि जास्त उत्साहानें सतत चालू ठेवला आहे व त्यांत उत्क्रांति वादाप्रमाणें नवीन नवीन अर्थशास्त्रांतील शोधबोध लक्षांत घेऊन पूर्वीच्या दिव्याला अधिक प्रकाशदायी असें स्वरूप दिलें जात आहे, हें पाहून या विषयाची आवड असणाऱ्या आमच्यासारख्यांना फार आनंद होत आहे. तत्संबंधीचा उत्साह वाढविण्यास स्वार्थत्यागपूर्वक चालविलेल्या “अर्था”सारख्या वर्तमानपत्राचा आम्हांस फार उपयोग वाटत आहे.”

“व्यापारी महाराष्ट्र”<br>पुणें } न. प. केळकर

---

“अर्थानें १८ वर्षें पूर्ण करून तो आतां १९ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे याबद्दल आनंद वाटला. सध्याच्या काळांत केवळ करमणुकीला वाहिलेल्या नियतकालिकांच्या संचालकांनाहि चिंतेनें ग्रस्त केलें आहे, तर “अर्था” सारख्या गंभीर व शास्त्रीय विषयाला वाहिलेल्या नियतकालिकाच्या संपादकाला त्याच्या संगोपनाची काळजी किती वाटत असेल याची कल्पनाच केलेली बरी. परंतु याहि परिस्थितींत आपण मोठ्या धैर्यानें व ध्येयवादीपणानें तें चालविलें आहे हें आपणांस भूषणावह आहे. “अर्था”चें संपादन वैशिष्ट्यपूर्ण रीतीनें व जबाबदारीनें होत असतें हें मी स्वानुभवावरून सांगतों. बँकिंग, सहकार, निवडक तत्संबंधी कायदेशीर निवाडे व विविध, मनोरंजक आणि ज्ञानदायक बातम्या हीं अर्थाची खास वैशिष्ट्यें आहेत. कोणत्याहि विषयावरील आपलें विवेचन मुद्देसूद, सावध व व्यावहारिक स्वरूपाचें असतें. यापुढेंहि आपल्या हातून अखंडितपणें “अर्था”चें संपादन उज्ज्वल तऱ्हेनें व्हावें व लवकरच “अर्था” च्या पंचवीस वर्षांच्या कामगिरीचा जाहीर गौरव व्हावा अशी शुभेच्छा व्यक्त करून हें पत्र पुरें करतों.”

“ज्ञानेश्वर”<br>पुणें } वि. त्र्यं. शेटे

# अर्थ

बुधवार, ता. ७ जानेवारी, १९५३





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## जपानच्या औद्योगीकरणापासून काय शिकतां येईल ?

जपानमधील हिटोटसुबाशी विद्यापीठाचे प्रो. डॉ. शिगेटो त्सुरू हे सध्या भारतांत आले आहेत. दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ह्या संस्थेंत त्यांनीं नुकतेंच एक भाषण केलें. 'आशिआच्या आर्थिक विकासांत जपानचें स्थान' असा व्याख्यानाचा विषय होता. आशिआ खंडांत जगांतील बहुसंख्य लोक रहात असल्यानें त्यांची आर्थिक स्थिति सुधारल्याशिवाय जगापुढील प्रमुख राजकीय प्रश्न सुद्धां सुटणार नाहींत हा विचार आतां बहुतांशीं मान्य झालेला आहे. ही स्थिति सुधारण्यासाठीं औद्योगीकरण झालें पाहिजे ह्या मुद्याबद्दलहि वाद राहिला नाहीं. औद्योगीकरण कसें आणि कोणत्या गतीनें घडवून आणावें ह्याबद्दल मात्र तज्ज्ञांत सुद्धा मतभेद असलेले दिसतात. म्हणून जपानच्या औद्योगीकरणांत आलेले अनुभव अविकसित आशिआई राष्ट्रांना मार्गदर्शक होतील असें वाटतें. ह्या दृष्टीनें डॉ. त्सुरू ह्यांनीं व्याख्यानांत व्यक्त केलेले विचार महत्त्वाचे वाटतात. डॉ. त्सुरू म्हणाले, "जपाननें आपलें औद्योगीकरण झपाट्यानें केलें. तेव्हां जपानच्या अनुभवाचा आशिआंतील राष्ट्रांना काय उपयोग होईल असा प्रश्न करण्यासारखा आहे. सरंजामदारी अर्थपद्धतीपासून भांडवलदारी अर्थपद्धतीर्यंतचा प्रवास जपाननें ३० वर्षांत केला. हें संक्रमण घडवून आणतांना परकीय देशांची मदत जपाननें फारच थोडी घेतली. अनिर्बंध नफ्याची आकांक्षा हीच संक्रमणामागील प्रेरकशक्ति होती. पण ह्याचा अर्थ असा नाहीं कीं, इतर देशांनीहि तोच मार्ग अनुसरावा. दुसऱ्या एखाद्या देशानें आपला विकास नियोजक समाजवादी अर्थपद्धतीनें करून घेणें अगदी शक्य आहे. खरा मूलभूत प्रश्न असा आहे कीं, अविकसित राष्ट्रांनीं आपलें औद्योगीकरण कशा रीतीनें घडवून आणावें. हा विकास साधतांना परकीय मदतीवांचून अडेलच किंवा काय? माझा स्वतःचा विश्वास असा आहे कीं, परकीय मदतीच्या मागें राजकीय धागेदोरे अंशतः तरी राहणारच. १८६९–१८९९ ह्या कालखंडांत जपाननें आपलें औद्योगीकरण साधलें. ह्या कामीं जपाननें स्वस्त मजुरी आणि नियंत्रित चलनवृद्धि ह्यांचा उपयोग करून घेतला. घरच्या बाजारपेठांवर निर्बंध घालण्यांत आले आणि निर्यातीवर अधिक जोर देण्यांत आला. राजकीय दृष्ट्या विचार करतां ह्या कालांत जपाननें बाह्य जगांत साम्राज्यशाहीचा आणि घरीं शस्त्रास्त्रांच्या शर्यतीचा मार्ग स्वीकारला. १९४५ सालीं जपानचा पराभव झाल्यावर भांडवलदारांचा हा जुगार अर्थातच थांबला. अविकसित देशाला आर्थिक प्रगति करण्यासाठीं भांडवलाचा सांठा लागतो. पण तो त्याच्याजवळ नसतो. जपाननें जी यंत्रणा भांडवल उभारणीसाठीं वापरली तिची शिफारस भारतासाठीं अर्थातच करतां येत नाहीं. म्हणून भारतापुढें दोनच मार्ग आहेत; आणि ते म्हणजे नियोजित समाजवादी अर्थव्यवस्था अगर संमिश्र अर्थव्यवस्था. जपानच्या अनुभवावरून एवढें स्पष्ट दिसतें कीं आर्थिक कार्यक्रम हा अंमलांत आणण्यासारखा मात्र पाहिजे. ह्या कार्यक्रमामागील प्रेरक-शक्ति कोणती असावी हा महत्त्वाचा प्रश्न आशिआंतील राष्ट्रांनीं सोडविला पाहिजे. संमिश्र अर्थव्यवस्था योग्य ती प्रेरक-शक्ति निर्माण करूं शकेल काय, ह्या प्रश्नाचें उत्तर अद्याप मिळालेलें नाहीं."

भारतीय सरकारनें नुकताच जाहीर केलेला पंचवार्षिक कार्यक्रम हा संमिश्र अर्थव्यवस्थेचा एक प्रयोग आहे. तो यशस्वी होणें अगर न होणें लोकांच्या उत्साहावर अवलंबून आहे असें सांगण्यांत येतें. हा उत्साह निर्माण कसा करावयाचा, हा प्रश्न अर्थातच सोपा नाहीं.

---

## जाहिरातीच्या व्यवसायाचें प्रदर्शन

जाहिरात आणि प्रसिद्धि ह्यांचा प्रभाव वृत्तपत्रांचा प्रसार झाल्यापासून खूपच वाढला हें खरें असलें तरी अगदीं प्राचीन काळांतहि त्यांचें अस्तित्व होतें. स्टॉकहोम येथें प्रसिद्धीच्या साधनांचा इतिहास दर्शविणारें एक प्रदर्शन नुकतेंच भरविण्यांत आलें. ह्या प्रदर्शनांत गेल्या तीन हजार वर्षांत जाहिरातींचा विकास कसा होत गेला तें दाखविण्यांत आलें आहे. रोममध्यें पूर्वीं तरवारींनीं द्वंद्वयुद्धें खेळणारे युद्धपटु असत. त्यांची प्रसिद्धि देण्यांत येत असे तें प्रदर्शनांत दाखविण्यांत आलें आहे. हल्लीं सिनेमांतील नटनटींची जशी प्रसिद्धि करण्यांत येते तशी त्या काळीं ह्या युद्धपटूंची जाहिरात करण्यांत येत असे. ग्रीसमधील दारू पिण्याच्या कांचेच्या पात्रांचाहि प्रसिद्धीसाठीं उपयोग करण्यांत येत असे. ह्या पात्रांवर द्राक्षासाठीं प्रसिद्ध असलेल्या गांवांची खूण म्हणून द्राक्षांचे वेल काढण्यांत येत असत. भारतांत येऊन गेलेला रोमन बादशहा आपली प्रसिद्धि भरपूर प्रमाणांत करीत असे. ह्याचा उल्लेख प्रदर्शनांत केलेला आहे. १७ व्या शतकांत वृत्तपत्रांचा उपयोग जाहिरातीसाठीं प्रथम करण्यांत आला. त्यावेळच्या वृत्तपत्राचा एक अंकहि प्रदर्शनांत ठेवण्यांत आला आहे. त्याशिवाय होगार्थ ह्या ब्रिटिश चित्रकारानें काढलेलीं व्यंगचित्रेंहि मांडण्यांत आलीं आहेत. १९ व्या शतकांतील सचित्र मासिकांतून जाहिरात करणारीं चित्रें येत असत. अशा कांहीं मासिकांचे नमुनेहि प्रदर्शनांत ठेवण्यांत आले आहेत. १९ व्या शतकांतील कांहीं पोस्टर्सहि मांडण्यांत आलीं आहेत. अगदीं अलीकडे जाहिराती व प्रसिद्धि ह्यासंबंधानें ज्या कल्पना व पद्धति अंमलांत आल्या आहेत त्याची माहितीहि प्रदर्शनांत करून देण्यांत आली आहे. जागतिक बाजारपेठांची निर्मिति आणि वृत्तपत्रांचें सर्वगामित्व ह्यांच्या योगानें आजची प्रसिद्धीचीं व जाहिरातींचीं साधनें अर्थातच अधिक प्रभावी झालेलीं आहेत.

---

**बार्शी लाइट रेल्वे**—१ जानेवारी १९५४ रोजीं बार्शी लाइट रेल्वे विकत घेण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. रेल्वेची लांबी २०२ मैल असून त्यांपैकीं ३६ मैल आज भारतीय सरकारच्या मालकीचे आहेत. बाकीचा रस्ता एका ब्रिटिश रेल्वे कंपनीच्या मालकीचा आहे.

## बँकांच्या अडचणींची चर्चा

(१)

(लेखकः—श्री. गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., डायरेक्टर, बेळगांव बँक लि.)

बँकिंग प्रदर्शनाच्या अनुषंगानें पुणें येथें जमलेल्या, मराठी विभागांतील बँकांच्या प्रतिनिधींनीं, १ डिसेंबर १९५२ रोजीं दुपारीं २-३० वाजतां पुणें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत श्री. वामनराव वर्दे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं अनौपचारिक रीतीनें बँकांपुढील महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा केली.

"अर्था"चे संपादक श्री. श्री. वा. काळे ह्यांनीं परगांवच्या बँकांच्या प्रतिनिधींना १ डिसेंबर, १९५२ रोजीं सकाळीं चहापानास बोलाविलें होतें. त्यावेळीं अशा चर्चेची आवश्यकता असल्याचें दिसून आलें आणि त्याप्रमाणें दुपारीं जमण्याचें ठरलें. श्री. काळे ह्यांच्या सकाळच्या पाहुणचारामुळें चर्चेस चालना मिळाली, हें नमूद करण्यास मला आनंद वाटतो.

उपस्थित प्रतिनिधींनीं प्रारंभीं प्रत्येकानें ज्याची-त्याची ओळख करून दिल्यावर, त्यांच्यामधील अंतर एकदम तुटून स्नेहाचें व खेळीमेळीचें वातावरण निर्माण झालें व प्रत्येकास बोलण्यास पुरेसा वाव मिळाल्याकारणानें कोणासहि, कोणताहि मुद्दा मांडण्यास पुरेशी संधि मिळाली नाहीं, असें झालें नाहीं. श्री. वर्दे ह्यांच्यासारखा तज्ञ, अनुभवी व सहृदय अध्यक्ष चर्चेस लाभल्यामुळें त्यांच्या ज्ञानाचा व मार्गदर्शनाचा फायदा सर्वांस मिळूं शकला, शंकांचें निरसन होऊं शकलें व कित्येक महत्त्वाच्या सूचनांस दुजोरा मिळून बँकर्सना त्यांच्या प्रश्नांचें अधिक चांगलें आकलन होण्यास मदत झाली व परस्पर-विश्वास वाढला. सायंकाळीं ६-३० वाजतां चर्चा संपल्यावर चहापान होऊन सर्व जणांनीं समाधानानें निरोप घेतला.

चर्चिलेल्या प्रश्नांची मुख्य दोन भागांत वाटणी करतां येईल. (१) जे प्रश्न सोडविण्यासाठीं वरिष्ठ अधिकारी-संस्थांकडे (उदाहरणार्थ सरकार, रिझर्व्ह बँक) दाद मागितली पाहिजे असे प्रश्न, आणि (२) जे प्रश्न बँका स्वतःच सोडवूं शकतील असे प्रश्न. त्यांपैकीं पहिल्या प्रकारच्या प्रश्नांचें दिग्दर्शन येथें करण्यांत आलें आहे.

### (१) करामध्यें सवलत

(अ) रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करण्यांत येणाऱ्या रकमा ह्या वांटून न टाकलेल्या नफ्याचा भाग असतो व त्याची भांडवल वाढीस मदत होते, म्हणून त्या रकमास कर माफ असावेत. वसूल भांडवलाची बरोबरी होईल इतका रिझर्व्ह फंड होईपर्यंत तरी ही सवलत देण्यांत यावी.

(ब) सध्या सर्व बँकिंग कंपन्यांवर एकाच दरानें कॉर्पोरेशन टॅक्स व इन्कम टॅक्स आकारण्यांत येतो. १० कोटी रुपयांपेक्षा कमी खेळतें भांडवल असणाऱ्या बँकांना ह्या दरांत कांहीं सवलत देण्यांत यावी. नोकरवर्गाच्या पगाराच्या श्रेणी व इतर खर्चिक हक्क ह्या बाबतींत त्यांचेवर ज्या आर्थिक जबाबदाऱ्या टाकण्यांत आल्या आहेत, त्या पार पाडण्यास त्यामुळें सरकारकडून थोडी-फार मदत मिळेल.

### (२) स्टॅच्युटरी रिझर्व्ह

कराच्या तरतुदीची रक्कम वजा टाकून झाल्यावर स्टॅच्युटरी रिझर्व्हची रक्कम ठरविण्यांत यावी. त्यामुळें डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंडांत टाकण्यासाठीं अधिक रक्कम उरूं शकेल. स्टॅच्युटरी रिझर्व्हचा वाटा ठरवितांना कराच्या तरतुदीचा विचार अनावश्यक आहे, कारण त्या तरतुदीचा नफ्यावर अग्रहक्क आहे. कायद्यांत जरूर ती दुरुस्ती करून हें घडवून आणावें.

### (३) कोर्टांतील दावे

बँकांचे हिशेब वक्तशीर ठेवले जातात व व्यवस्थित तपासले जातात; तेव्हां त्यांनीं सिव्हिल कोर्टांत कर्जवसुलीसाठीं लावलेले दावे समरी पद्धतीनें निकालांत काढण्यांत यावेत. डिक्री प्रथम देऊन मग प्रतिवादीस ती बजावूं का नये ह्याचीं कारणें देण्यास लावण्याचा हुकूम काढणें कोर्टास शक्य व्हावें, अशी खास कायदेशीर व्यवस्था केली, तर ती फार उपयुक्त ठरेल. निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्सच्या बाबतींत ही पद्धत हायकोर्टामध्यें अंमलांत आहे. बँकांनीं ठेवीदारांचीं देणीं तात्काळ द्यावयाचीं असतात, परंतु कोर्टामार्फत कर्जवसुलीचें सध्याचें तंत्र कंटाळवाणें व दीर्घसूत्री असून बँकांच्या तोट्याचें आहे. बँकांच्या दाव्यांत, डिक्रीमध्यें हप्त्यांची सवलत ठेवण्यांत येऊं नये. ठेवीदारांना ठेवींवर ४% पर्यंत व्याज द्यावें लागतें, तेव्हां डिक्रीनंतरच्या मुदतीचें व्याज ६% पेक्षा कमी असूं नये. सिव्हिल प्रोसीजर कोडमध्यें हें घडवून आणणारी दुरुस्ती करण्याचें महत्त्व कायदामंत्र्यांना पटवून दिलें पाहिजे. पुढें उपस्थित होणारे तंटे निर्देश केलेल्या पंचाकडे सोपविण्याचा उभय पक्षांत आगाऊ करार झाला, तर बरेंच कोर्टकाम वाचूं शकेल, परंतु हा मार्ग अवलंबिण्यापूर्वी कायदेशीर तज्ञ-सल्ला घेणें इष्ट होईल.

### (४) बँकांतील तंटे

बँक डिस्प्यूट्स इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलकडे निवाड्यासाठीं पाठविण्याची सध्याची पद्धति बँकिंगच्या धंद्यास निश्चितच पोषक नाहीं. मजूर चळवळीच्या मार्गानें हे तंटे जावेत, हें योग्य नाहीं. जनतेच्या पैशानें जनतेची सेवा करणाऱ्या बँकिंगच्या महत्त्वाच्या धंद्यास निश्चित वातावरणाची आणि सुरक्षिततेची आवश्यकता असते, तेव्हां बँका व नोकर ह्यांच्यामध्यें तंग वातावरण निर्माण होण्यास वावच राहूं नये अशी तरतूद केली पाहिजे. बँकिंगच्या धंद्याची मार्गदर्शक व वरिष्ठ संस्था रिझर्व्ह बँक ही आहे. तेव्हां तिला वेगवेगळ्या विभागांसाठीं, व्यावहारिक दृष्ट्या, बँक नोकरांच्या पगाराच्या श्रेणी व इतर नोकरींतील अटी-सवलती सर्व बँकांसाठीं ठरविण्याचा अधिकार देण्यांत यावा. (नवा इंडस्ट्रिअल रिलेशन्स ॲक्ट तयार होण्याच्या मार्गावर आहे, तेव्हां ह्या बाबतींत तातडीनें खटपट करण्यांत यावी.) तोंपर्यंतची योजना ह्या दृष्टीनें मध्यम आकाराच्या बँकांच्या तोकड्या मिळकतीवर ट्रायब्यूनलच्या अवार्डमुळें फार मोठा बोजा पडतो, म्हणून ५ कोटी रु. पर्यंतच्या खेळत्या भांडवलाच्या बँकांची ट्राब्यूनलच्या अवार्डमधून मुक्तता करण्यांत यावी.

### (५) इंडस्ट्रिअल रिलेशन्स ॲक्ट आणि शॉप ॲक्ट

सध्या ह्या दोन्ही कायद्यांची अंमलबजावणी बँकांवर एकदमच चालू आहे, त्यामुळें पुष्कळ वेळां घोटाळ्याची परिस्थिति निर्माण होते. म्हणून दोहोंपैकीं एकच कायदा बंधनकारक असावा.

### (६) सरकारकडून संरक्षण

(अ) जेथें सरकारी ट्रेझऱ्या किंवा सब ट्रेझऱ्या आहेत अशा ठिकाणीं असलेल्या बँक-शाखांची तेथें त्यांच्या थैल्या-पेट्या सुरक्षित ठेवण्याची योग्य सोय व्हावी. खेडेगांवांतून बँकिंगचा प्रसार करण्याच्या दृष्टीनें रिझर्व्ह बँकेनें ह्या बाबतींत तरतूद केली

असली, तरी महसूलखात्याच्या अधिकाऱ्यांचें धोरण पुरेसें सहाय्यकारक नसतें, असा अनुभव येतो.

(ब) बँकांच्या रकमा इकडून तिकडे हालविण्यांत येतात, त्यास हत्यारी पोलिसांचें संरक्षण मिळालें पाहिजे. अशा संरक्षणाची पोलिस अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून व्यवस्था केली, तरी ते अधिकारी न पटण्याजोग्या तांत्रिक अडचणी उपस्थित करतात. (रकमेच्या मानानें साधारणतः पुरेसें संरक्षण देण्यांत आल्यावर, प्रत्यक्ष पाठविलेल्या रकमेचा आकडा सांगण्याचें कारण असूं नये किंवा बँकांनींच संरक्षणाच्या प्रमाणांत पाठविण्याच्या रकमा मर्यादित कराव्यात.) अमेरिकेंत, बँकांच्या रकमांची ने-आण करणाऱ्या स्वतंत्र कंपन्याच आहेत, अशी माहिती कांहीं सभासदांनीं चर्चेच्या वेळीं सांगितली.

**(७) चिकटविण्याचे स्टँप्स**

शहरें सोडलीं तर, इतर ठिकाणीं चिकटविण्याचे स्टँप्स उपलब्धच नसतात. जेथें अशा स्टँप्सना बँकांची मागणी असते, अशा ठिकाणीं ते मिळण्याची व्यवस्था सरकारनें करावी.

**(८) नॉन-शेड्यूल्ड बँका**

बँकिंग कंपन्यांचा कायदा देशांतील सर्व बँकांना लागू करण्यांत आला असल्याकारणानें, रिझर्व्ह बँकेनें बिगर-शेड्यूल्ड बँकांचे बाबतींत तफावत करण्याचें कारण नाहीं अशी बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या प्रतिनिधींनीं तक्रार केली. अशी तफावत करावयाची, तर रिझर्व्ह बँकेनें त्यांचा लहान आकार व कारभार लक्षांत घेतां त्यांना कांहीं सवलती तरी द्याव्यात. बिगर-शेड्यूल्ड बँकांना रिझर्व्ह बँक सरकारी रोख्यांच्या तारणावरहि कर्ज देत नाहीं. ग्रामीण व मागासलेल्या क्षेत्रांतील जनतेच्या गरजा ह्याच बँका मुख्यतः भागवीत असतांना त्यांना असें वागविणें श्रेयस्कर नाहीं.

**(९) हुंड्या री-डिस्कौंट करण्याची सोय**

रिझर्व्ह बँकेनें हुंड्यांच्या री-डिस्कौंटिंगची नवी सोय अंमलांत आणली आहे; तिचा फायदा फक्त कांहीं थोड्या मोठ्या बँकांसच मिळूं शकतो. ह्या नव्या सोईच्या अटी सैल करून, हुंड्यांच्या सर्व निर्दोश व्यवहारांना ती सोय उपलब्ध करण्यांत यावी.

---

**अन्नासाठीं माशांचा उपयोग**—नॉर्वेजिअन कौन्सिल ऑफ वुइमेन्स ही संस्था, माशांचा अन्न म्हणून कसा व किती उपयोग होतो तें समजावून सांगणारी एक पुस्तिका काढणार आहे. पुस्तिकेचें भाषांतर करून त्याच्या प्रती जगभर वांटण्यांत येणार आहेत. नॉर्वेमधील लोक बऱ्याच मोठ्या प्रमाणांत मासे खाणारे आहेत.

**अमेरिकन कुटुंबांचा विस्तार**—अमेरिकेच्या शिरगणती-खात्यानें प्रसिद्ध केलेल्या आंकड्याप्रमाणें अमेरिकेची लोकसंख्या १५·८ कोटी आहे. कुटुंबांची संख्या ३,९८,२२,००० आहे. कुटुंबांच्या संख्येंत गेल्या दहा वर्षांत १० टक्के वाढ झालेली दिसून येते. अमेरिकन कुटुंबांत सरासरी ४ माणसें असतात.

**विजेचा पुरवठा बंद केला**—दार्जिलिंग आणि घूम ह्या स्टेशनाकरतां खर्च होणाऱ्या विजेचे पैसे न भरल्यामुळें दार्जिलिंग म्युनिसिपालिटीनें त्या स्टेशनांचा विजेचा पुरवठा बंद केल्याचें समजतें. गेले कांहीं दिवस ह्या स्टेशनावरील यार्डांत व फलाटावर रॉकेलचे दिवे वापरण्यांत येत आहेत.

## परदेशांकडे विमानानें पार्सलें नेण्याची व्यवस्था

### २ जानेवारी, १९५३ पासून सुरू झाली

या देशाहून येथ अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, इजिप्त, स्वित्झर्लंड आणि ऑस्ट्रेलिया या ठिकाणांकडे विमानानें पार्सलांची ने-आण करण्याची व्यवस्था जानेवारी १९५३ पासून चालू होणार आहे.

निरनिराळ्या देशांसाठी हवाई आकार व टपालहांशिलाचे दर पुढीलप्रमाणें आहेत:—

| देश | पहिल्या रत्तलास असलेला हवाई आकार व टपाल हंशील<br>रु. आ. पै | त्यानंतरचे ४ औंस अगर त्याच्या भागाचें टपाल हंशील व हवाई आकार<br>रु. आ. पै |
|---|---|---|
| अमेरिका | १५—८—० | ३—८—० |
| इंग्लंड | ८—८—६ | १—९—० |
| फ्रान्स | ९—८—० | १—८—० |
| इजिप्त | ७—०—० | १—०—० |
| स्वित्झर्लंड | ८—०—० | १—८—० |
| ऑस्ट्रेलिया | ८—८—० | १—१२—० |

जास्तींत जास्त ११ रत्तल वजनाचीं पार्सलें स्वीकारण्यांत येतील परंतु तूर्त विमा उतरलेलीं पार्सलें घेतलीं जाणार नाहींत.

अमेरिका, फ्रान्स, स्वित्झर्लंड, इंग्लंड आणि इजिप्त या देशांकडे विमानानें जाणारीं पार्सलें मुंबईहून व ऑस्ट्रेलियाकडे जाणारीं कलकत्त्याहून पाठविण्यांत येतील.

---

## अमेरिकेची परदेशांतील भांडवल-गुंतवणूक

आशिया खंडांतील अविकसित देशांना आपला औद्योगिक विकास साधण्यासाठीं भांडवलाची गरज आहे. स्वतःच्या देशांत हें भांडवल पूर्णांशानें उभारण्याची फारशी शक्यता नसल्यानें अमेरिका-इंग्लंडसारख्या देशांकडून तें घ्यावें लागतें. अमेरिकेच्या व्यापार खात्यानें अमेरिकेनें परदेशांत गुंतविलेल्या भांडवलासंबंधी कांहीं माहिती नुकतीच जाहीर केली आहे. अमेरिकेनें जितकें भांडवल परदेशीं गुंतविलें आहे त्यापैकीं ७० टक्के म्हणजे सुमारें ८२० कोटी डॉलर्स भांडवल प. गोलार्धांत गुंतविलेलें आहे. भारतांत गुंतविलेलें अमेरिकन भांडवल ३·८ कोटी डॉलर्स आहे. युद्ध संपल्यापासून अमेरिकन भांडवल तेलाच्या धंद्यांत सगळ्यांत मोठ्या प्रमाणांत गुंतविण्यांत आलें आहे. तथापि इतर उद्योग-धंद्यांत गुंतविण्यांत आलेलें भांडवलहि कांहीं कमी नाहीं. १९५० अखेर इतर कारखान्यांत गुंतविलेलें भांडवल ३८० कोटी डॉलर्स होतें. प. युरोपमधील देशांतहि अमेरिकेनें बरेंच भांडवल गुंतविलेलें आहे. तरीपण प. गोलार्धाच्या बाहेरील कोठल्याहि देशांपेक्षा अधिक भांडवल ब्रिटनमध्यें गुंतविण्यांत आलें आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. इतर कांहीं देशांत गुंतविलेल्या भांडवलाचे आकडे पुढीलप्रमाणें आहेत:— पर्शिअन आखातासभोंवतालचे देश ७२·६ कोटी डॉलर्स, फ्रान्स २८·५ कोटी डॉलर्स, ऑस्ट्रेलिआ १९·८ कोटी डॉलर्स, द. आफ्रिका १४ कोटी डॉलर्स, फिलिपाईन्स बेटें १४·९ कोटी डॉलर्स, इंडोनेशिआ ५·८ कोटी डॉलर्स आणि इजिप्त ४ कोटी डॉलर्स. ह्या माहितीवरून अमेरिकन भांडवलाच्या कक्षेंत ब्रिटन, फ्रान्स व ऑस्ट्रेलिआसारखे प्रगत देशहि कसे गेले आहेत तें लक्षांत येतें. परकीय भांडवलाच्या मागोमाग थोड्याबहुत प्रमाणांत परकीय नियंत्रणाहि येतेंच, तेव्हां जगभर पसरत चाललेल्या डॉलर्सच्या प्रभावाचें भवितव्य काय, असा प्रश्न उभा रहातो.

### जागतिक बँकेकडून इंडियन आयर्न अँड स्टील कंपनीला कर्ज

आंतरराष्ट्रीय बँकेनें इंडियन आयर्न अँड स्टील कंपनी लिमिटेडला ३·१५ कोटी डॉलर कर्ज मंजूर केलें आहे. या कंपनींतच दि स्टील कॉर्पोरेशन ऑफ बेंगाल विलीन करण्यांत आली आहे. हें कर्ज ४॥। टक्के दरानें असून तें १५ वर्षे मुदतींत मुद्दल आणि व्याज मिळून सारख्या सहामाही हप्त्यानें फेडावयाचें आहे. या कर्जाची हमी भारत सरकारनें घेतली आहे. भारतांतील खाजगी कंपनीस जागतिक बँकेकडून कर्ज देण्याची ही पहिलीच वेळ आहे. जागतिक बँकेकडून मिळालेलें हें कर्ज, भारत सरकारनें खास आगाऊ देऊं केलेले १० कोटी रुपये व सरकारकडून आणली ७·९० कोटी रुपयांचें कर्ज, यांमुळें या कंपनीला पोलादाच्या उत्पादनांत जवळ जवळ ७ लाख टन व वरड लोखंडाच्या उत्पादनांत सुमारें ४ लाख टनांची वाढ करतां येईल.

### अमेरिकन नागरिक युद्धाला कंटाळले

नवीन वर्षाच्या प्रारंभीं अमेरिकन नागरिकांच्या मनांत इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षा एक गोष्ट अधिक सातत्यानें घोळत आहे. ती गोष्ट म्हणजे कोरिआंत रेंगाळत चाललेलें युद्ध हें युद्ध कायः वाटेल तें करून लवकर संपवावें असें बहुसंख्य अमेरिकन नागरिकांना वाटत आहे. प्रे. ट्रूमन ह्यांच्या सरकारांतील अधिकारी वर्ग आणि २० जानेवारीला अधिकारावर येणारा प्रे. आइसेनहोअर ह्यांच्या सरकारांतील अधिकारी वर्ग, ह्या दोहोंनाहि ह्या गोष्टीची चांगली जाणीव आहे. भोजनप्रसंगीं, मोटारींतून अगर रस्त्यावरहि नागरिक युद्धबंदीची चर्चा करतांना आढळून येत आहेत. कोरिआंतील युद्धासंबंधीं लोकमत अजमावण्याचे प्रयत्न करण्यांत आले असतां असें आढळून आलें कीं, १०० जणांना प्रश्न विचारले तर त्यांपैकीं ७५ जण कोरिआंतील युद्ध थांबवून अमेरिकन सैन्य परत बोलवावे ह्या मताचे आहेत.

॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २

### [ फक्त सिंडिकेटच्या ठेवीदारांच्या माहितीकरितां ]

(१) सिंडिकेटची नवीन मशिनरी म्हणजे खेळणीं विकणाऱ्या दुकानांतील मशिनरी नव्हे.

(२) "स्कोडा" कंपनीची नवीन एक हजार टनांची सेमि-इलेक्ट्रिक मशिनरी, मशिनरीची उभारणी, फॅक्टरी बिल्डिंग, इलेक्ट्रिक फिटिंग, शुगर हाऊस, स्प्रे टँक याला अंदाजें सत्तर लक्ष रुपये खर्च आलेला आहे.

(३) सिंडिकेटचा ऊंस म्हणजे चित्रांतला ऊंस नव्हे.

(४) २००० एकर उसाला, खतांच्या महागाईमुळें, अंदाजें तीस लक्ष रुपये खर्च येतो. वीरचें धरण झालें म्हणजे चार ते पांच हजार एकर ऊंस होईल. जमिनी घेऊन ठेवल्या आहेत.

(५) जुनी मशिनरी व फॅक्टरी इमारत याला १५ लक्ष रुपयांच्यावर खर्च झालेला आहे. विक्रीनंतर रक्कम वसूल होईल.

(६) डिस्टिलरीकरितां आतांपर्यंत अंदाजें १० लक्ष रुपये खर्च झाला आहे. लायसेन्स मिळाला म्हणजे उत्पादन सुरू होईल.

(७) क्वार्टर्स, शेड्स, गोडाउन्स, वर्कशॉप, ट्रॅक्टर्स, शेतीचीं इतर यंत्रें, मोटारी, स्पेअर पार्टस, स्टोअर्स, उसाच्या वजनाकरितां वेब्रिजेस, ग्रेनशॉप, ग्रेन गोडाऊन, लॅबोरेटरी, दवाखाना, लायब्ररी, हाहि खर्च असतो.

(८) पंचवीस लक्ष रुपयांचें शेअर भांडवल वजा करून किती लक्ष ठेवी व त्या ठेवींना असलेलें तारण व परत–फेडीचें साधन दिसून येईल.

(९) कागद, शाई, लेखणी, लेख यांच्या पलीकडे भांडवल जमवून कंपनी नफ्यांत चालविण्याची जबाबदारी ज्याच्यावर असते त्याला निव्वळ जाहिराती व लेखानें भांडवल मिळत नसून प्रत्यक्ष नफा करून दाखविला तरच शेअर किंवा ठेवींचें भांडवल मिळूं शकतें याचा अनुभव आलेला असतो.

(१०) "दहा वर्षे शेअरवर १० टक्के नफा व ठेवीवर ६ टक्के व्याज देऊन महाराष्ट्राचा पैसा महाराष्ट्रांत" राहिला आहे व पुढेंहि राहील.

(११) कार्यसिद्धि झाली आहे. व्याजाची किंवा मुद्दलाची बूड न करतां ठेवी परत करण्याची तजवीज साखरेच्या विक्रींतून चालूं आहे.

शेअर व ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड,
पुणें २.
दि. १ जानेवारी १९५३.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल्. बी.,
सी. जी. आगाशे अँण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

### उत्तर-प्रदेशांतील कुटुंबनियोजनाचे अनुभव

उत्तर-प्रदेशांतील रेड क्रॉस सोसायटीतर्फे सुमारें पावणेदोन वर्षांपूर्वी कुटुंब-नियोजनाची मोहीम चालू करण्यांत आली होती. ह्या मोहिमेनें केलेल्या कार्याचा अहवाल आतां प्रसिद्ध करण्यांत आला आहे. कार्य करण्यासाठीं एक खास उपसमिती नेमण्यांत आली होती. प्रथम कांहीं दिवस कार्याची व्याप्ति लखनौ शहरा-इतकीच मर्यादित करण्यांत आली होती. पण त्याचबरोबर राज्यांतील इतर भागांतहि इस्पितळांच्या साह्यानें हळूहळू मोहिमेचें क्षेत्र वाढविण्यांत येत होतें. खुद्द लखनौमध्यें आतां ६ माहितीकेंद्रें काम करीत आहेत. त्यांपैकी कांहीं स्त्रियांसाठीं असून कांहीं पुरुषांकरितां आहेत. ह्या केंद्रांतून वाङ्मय, आकृत्या, संततिनियमनाचीं साधनें, इत्यादि जरूर तें साहित्य ठेवलें आहे, सल्ला देण्याशिवाय कांहीं केंद्रांतून शस्त्रक्रियाहि करण्याची सोय आहे.

अहवालांत असें नमूद करण्यांत आलें आहे कीं, एकंदरींत ह्या बाबीकडे लोकांचें लक्ष अधिकाधिक वेधलें जात आहे. सध्या देशांत कुटुंब-नियोजनाला अनुकूल आणि प्रतिकूल असें बरेंच लिहिलें व बोललें जात आहे. तरी पण एकंदरीनें अनुकूल असणारांचीच संख्या अधिक आहे. उपसमितीनें आपलें काम सुरू केलें तेव्हां लोकांच्याकडून कामाला विरोध होईल असें वाटलें होतें. पण अनुभव उलट येऊन लोकांनीं अपेक्षेबाहेर उत्साह दाखविला. राज्यांतील ठिकठिकाणच्या इस्पितळांकडून आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून जी माहिती आली आहे तीवरूनहि लोकांनीं ह्या मोहिमेचें स्वागतच केल्याचें दिसून आलें. उत्तर-प्रदेशाखेरीज बिहार, बंगाल, मध्यप्रदेश, मद्रास, आसाम, मुंबई, राजपुताना व पंजाब ह्या राज्यांतील नागरिकांकडूनहि अनेक प्रकारच्या विचारणा उपसमितीकडे आल्या. ह्या बाबतींत लोकांची गरज पुरी करण्यासाठी अधिक विस्तृत प्रमाणावर कार्य करण्याची जरूरी अहवालांत नमूद करण्यांत आलेली आहे. उत्तर-प्रदेश सरकारनें चालू आर्थिक वर्षासाठीं कुटुंब-नियोजनाला मदत म्हणून १५,००० रुपयांची रकम मंजूर केली आहे. गेल्या जुलै महिना अखेर लखनौमधील केंद्रांतून करण्यांत आलेल्या कार्याची थोडक्यांत माहिती पुढीलप्रमाणें आहे. ७६ पुरुषांना आणि २,६४७ स्त्रियांना कुटुंब नियोजनाच्या बाबतींत सल्ला देण्यांत आला. ४०० जणांना संततिनियमनाचीं साधनें पुरविण्यांत आलीं आणि १२६ शस्त्रक्रिया करण्यांत आल्या. तथापि निरक्षरता आणि रूढीप्रियता ह्यांच्यामुळें कुटुंब-नियोजनाच्या बाबतींत अधिक जोराचा शैक्षणिक प्रचार करणें अगत्याचें आहे. विशेषतः ग्रामीण विभागांतून कुटुंब-नियोजनाचे फायदे समजावून सांगण्यासाठी विशेष प्रयत्न करणें जरूर आहे.

**पाकिस्तान फिल्म-परिषदेची मागणी**—अखिल पाकिस्तान फिल्म-परिषदेची बैठक कराची येथें नुकतीच झाली. भारतांतून आलेले जे बोलपट कस्टम्स खात्यानें अडकवून ठेवले आहेत ते मुक्त करण्याची मागणी करणारा ठराव मंजूर करण्यांत आला. भारतामधून येणाऱ्या चित्रपटांवर सरसहा बंदी घालण्याऐवजीं पाकिस्तान सरकारनें परवाना-पद्धति अंमलांत आणावी असें सुचविण्यांत आलें.

**वैद्यकीय कॉलेजांतून दुबार वर्ग**—भारतांत अधिक डॉक्टरांची गरज असल्यानें वैद्यकीय कॉलेजांतून दुबार वर्ग घेण्याची पद्धत सरकार अंमलांत आणणार असल्याचें समजतें. कॉलेजमधून हल्लीं जास्तींत जास्त जितके विद्यार्थी घेण्यांत येतात त्याच्यापेक्षा २५ टक्के अधिक विद्यार्थी घेण्याची परवानगी देण्याचेंहि घाटत आहे.

SAVE to help yourself and the NATION

WITH THE




THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
*Branches:* Dadar, Mahim, Poona & Belgaum

### भारतामधील कृत्रिम रबराचें उत्पादन

कलकत्ता येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलजीचे डायरेक्टर डॉ. जे. सी. घोष ह्यांनीं, इन्स्टिट्यूशन ऑफ इंडस्ट्रीज ह्या संस्थेच्या ४ थ्या वार्षिक सभेचे मुख्य पाहुणे म्हणून केलेलें भाषण रबराच्या उद्योगधंद्याच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. डॉ. घोष म्हणाले "भारतांत कृत्रिम रबराच्या उत्पादनाला भरपूर वाव असून त्यासाठीं लागणाऱ्या कच्च्या मालाचाहि तुटवडा नाहीं. आग्नेय आशिआंतील परिस्थिति पूर्वपदावर आली तरी सुद्धां तेथील देशांकडून जगाला लागणारें नैसर्गिक रबर पुरविणें शक्य होणार नाहीं. रबराचे उद्योगधंदे चालविणाऱ्या भारतीय कारखानदारांनीं हें लक्षांत घ्यावें कीं ह्या धंद्यांत जसजसे अधिक कुशल तंत्रज्ञ काम करूं लागतील तसतशी मालाच्या दर्जांत आणि कार्यक्षमतेंत सुधारणा होऊं लागेल." इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष मि. सेसिल स्टॅक म्हणाले कीं भारतानें आपल्या मालाचे नमुने निश्चित केले पाहिजेत आणि इतर देशांच्या मालाशीं तुलना होईल अशा दर्जाचा माल तयार केला पाहिजे. भारतानें रबराच्या बाबतींत स्वयंपूर्ण होणें अगत्याचें आहे ही गोष्ट कारखानदारांनीं आणि सरकारनें ओळखलेली आहे. भारतामधील रबराच्या कारखानदारांना १९५१ सालीं २,२२७० टन रबर लागलें व त्यांपैकीं १७-१४८ टन रबर देशांत तयार होऊं शकलें. १९६१ सालीं कारखानदारांची रबराची मागणी ३५,००० टनापर्यंत वाढेल असा अंदाज आहे. इन्स्टिट्यूटचा भारतीय विभाग १९४८ सालीं स्थापन करण्यांत आला. तेव्हापासून ह्या विभागानें आपला तांत्रिक दर्जा वाढविण्याच्या कामांत पुष्कळच प्रगति केलेली आहे. रबराच्या बाबतींत भारताचें परावलंबित्व नाहींसें करण्यासाठीं ज्या योजना आखण्यांत आल्या आहेत त्या लवकरच फलद्रूप होतील अशी आशा त्यांनीं व्यक्त केली.

**३०० जागांसाठीं ५०,००० अर्ज**—बिहार स्टेट ट्रॅन्सपोर्टमध्यें ३०० जागा भरावयाच्या आहेत म्हणून जाहिरात दिली असतां त्या जागांसाठीं ५०,००० अर्ज आले. त्यांत बी. ए. व एम्. ए. झालेल्यांचेहि अर्ज होते. त्यांनीं बस कंडक्टर्सच्या व कारकुनांच्या जागाहि स्वीकारण्याची तयारी दाखविली होती. बिहार सर्कल पोस्ट व टेलिग्राफ खात्यांतील १०० कारकुनांच्या जागांसाठीं ८,००० अर्ज आले.

**नॉर्वेमधील मोबाइल बँक**—बर्गेन (नॉर्वे) येथील पहिल्या मोबाइल बँकेच्या कामास प्रारंभ झाला आहे. ही बँक-बस आपल्या खातेदारांना ठराविक वेळीं भेट देते. तिचे चार बस स्टॉप ठरलेले आहेत, तेथें दर एक दिवसाआड बँकेचें काम दोन तास चालतें. सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार बँक-बसमध्यें होतो. तिचेमध्यें टेलिफोनहि पण आहे.

## बँक डिस्प्यूट्स : बँक नोकरांचा दृष्टिकोन

( लेखकः—एक बँक कामगार )

अर्थाच्या तारीख १० डिसेंबर, १९५२ च्या अंकांत "बँक डिस्प्यूटस मिटविण्याचे अधिकार रिझर्व बँकेकडेच असावे" या मथळ्याखालीं जो लेख छापला गेला आहे व जें मत प्रदर्शित केलें गेलें आहे तें अगदीं एकांगी वाटल्यामुळें त्याच्या दुसऱ्या बाजूचे कांहीं विचार अंशतः येथें देत आहें.

रिझर्व बँकेच्या आणि पर्यायानें बँकिंग इंडस्ट्रीच्या आतांपर्यंतच्या इतिहासाकडे जर नजर टाकली तर आणि लहानमोठ्या बँकांवर नियंत्रण ठेवण्याचें रिझर्व बँकेचे कार्याचा विचार केला तर फक्त ठेवीदारांच्या ठेवींची सुरक्षितता बँकांनीं कशी ठेवली आहे व व्यापाऱ्यांच्या जगांत कोणत्या धंद्याची कशी प्रगति होत आहे याकडेच प्रामुख्यानें लक्ष दिलें जाते, असें म्हणणें अस्थानीं होणार नाहीं. हें कार्य खरोखरच महान कार्य आहे. पण कोणत्या बँकेंत किती नोकर आहेत, त्यांचें वेतन काय आहे, त्यांच्या अडचणी काय आहेत व त्या दूर कशा होतील याकडे मात्र बँकांनीं पूर्णपणें दुर्लक्ष केलें आहे. तसेंच ती जबाबदारी रिझर्व बँकेवराहि नाहीं.

लहानमोठ्या बँकांचे कारभार पाहिले तरी निराशाच पदरीं येते. ठेविदारांना व्याज कसें देतां येईल? शेअरहोल्डर्सना जास्तींत जास्त डिव्हिडंड कसें देतां येईल? रिझर्व्ह फंड कसा वाढेल? व बँकांची पत कशी वाढेल एवढेंच त्या पहातात. तसेंच, कमींत कमी वेतनावर नोकरवर्ग नेमून त्यांचेकडून जास्तींत जास्त काम कसें करून घेतां येईल, अन् एकादे बँकेंतील नोकर हक्कासाठी व वेतनासाठी झगडूं लागले तर त्यांचेंतील प्रामुख्यानें भाग घेणाऱ्याचा कांटा – आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून – कसा काढावा याकडेहि विशेष लक्ष असतेंच. मग त्या नोकरांचें हित पहाणार कोण? अशा परिस्थितींत विविध क्षेत्रांतील तसेंच बँकांतील कामगारांना अधिक वेतन यावें, संरक्षण यावें अशी आस्था बाळगणाऱ्या "सरकारनिर्मित" "इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल"कडेच बँक कामगारांचे हितसंबंधित प्रश्न सोडविण्याचे अधिकार ठेवल्यास अधिक श्रेयस्कर होणार आहे. शिक्षकांचे वेतन ठरविण्यांत आलें, सरकारी खात्यांत काम करणाऱ्यांचें वेतन शैक्षणिक दर्जाप्रमाणें ठरविण्यांत आलें त्याचप्रमाणें बँक नोकरांचें वेतन, महागाई भत्ते, स्थानिक भत्ते, हक्क, वगैरे बाबत योग्य तो विचार करून व जीवनमानाचा प्रश्न योग्य रीतीनें योग्य त्या खात्यामार्फत ठरवून दिल्यास व त्याप्रमाणें बँकांवर योग्य बंधनें एकदा घालून दिल्यास बँकांतील नोकर व अधिकारीवर्ग यांचेमध्यें सलोखा खात्रीनें निर्माण होईल यांत संशय नाहीं. कारण या जगांत इतर क्षेत्रांत काम करणाऱ्यांना जसा जगण्याचा हक्क आहे, बँकेच्या पैशावर व्यापाऱ्यांना, उद्योगधंदे करणाऱ्यांना, बँका चालवणाऱ्या अधिकारीवर्गाला जसा जगण्याचा हक्क आहे तसाच बँकेंतील नोकरांनाहि बँकेच्या पैशावर—नफ्यावर जगण्याचा हक्क आहे ही गोष्ट विसरून या लोकशाहीच्या जगांत चालणार नाहीं.

लहानमोठ्या बँकांनीं जीवनमानाचा विचार करून कामगारांना योग्य वेतन व योग्य सवलती आणि हक्क प्राप्त करून दिल्यास बँकांचें हितच होईल व ज्या संस्थेंत ते काम करतात त्या संस्थेबद्दल आपलेपणा व प्रेम निर्माण होईल. आणि असें झाल्यास "बँक डिस्प्यूटस" उद्भवणार नाहींत अन् ते मिटविण्याचे प्रश्न कोणाकडे असावेत हाहि प्रश्न उपस्थित होणार नाहीं.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम. ए., एलएल. बी. — श्री. वा. ग. घंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. वी. वाळवेकर ( अध्यक्ष ) ‖ श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |

एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८३१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.